नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक १३/१०/२०२६ (मंगळवार )

---

## नागपूर ग्रामीण जिल्हयाअंतर्गत 'सडक सुरक्षा मित्र' प्रशिक्षण कार्यक्रम; रस्ते सुरक्षा आणि अपघातग्रस्तांना तातडीची मदत देण्यासाठी युवकांना प्रशिक्षण

रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालय (**Ministry of Road Transport and Highways**) आणि युवा कार्यक्रम आणि क्रीडा मंत्रालय (**Ministry of Youth Affairs and Sports**) यांच्या मार्गदर्शनाखाली मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण आणि श्री अनिल म्हस्के ,अपर पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या नेतृत्वात नागपूर ग्रामीण जिल्हयात सेव्हलाइफ फाउंडेशनच्या तांत्रिक सहकार्याने 'सडक सुरक्षा मित्र' (**Sadak Suraksha Mitra – SSM**) प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. जिल्ह्यात रस्ते सुरक्षा विषयक जनजागृती वाढविणे, १८ ते २८ वयोगटातील युवक स्वयंसेवकांना आवश्यक कौशल्यांचे प्रशिक्षण देणे आणि रस्ते अपघातांच्या वेळी तातडीने मदत उपलब्ध करून देण्याची क्षमता विकसित करणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता.

या प्रशिक्षणादरम्यान वाहतुकीचे नियम, अतिवेगाने वाहन चालविणे, विरुद्ध दिशेने वाहन चालविणे तसेच हेल्मेट व सीटबेल्टचा वापर न करणे यांसारख्या रस्ते अपघातांना कारणीभूत ठरणाऱ्या धोकादायक बाबींविषयी मार्गदर्शन करण्यात आले. तसेच, अपघातग्रस्तांना मदत करणाऱ्या व्यक्तींच्या संरक्षणासाठी असलेली 'गुड समॅरिटन' (**Good Samaritan**) व्यवस्था, पीएम राहत योजना (**PM RAHAT Scheme**) आणि आघातग्रस्तांना वैद्यकीय उपचार मिळण्याचा अधिकार (**Right to Trauma Care**) याविषयी सहभागी ५० प्रशिक्षणार्थी युवकांना माहिती देण्यात आली

प्रशिक्षणामध्ये रस्ते अपघाताच्या ठिकाणी प्रथम प्रतिसाद देण्याच्या पद्धतींवर विशेष भर देण्यात आला. यामध्ये रक्तस्राव नियंत्रित करणे, हृदय—फुफ्फुस पुनरुज्जीवन (**CPR**), अपघातस्थळाची सुरक्षितता सुनिश्चित करणे, जखमींना सुरक्षितपणे मदत करणे तसेच विविध यंत्रणांमध्ये समन्वय साधणे या बाबींचा समावेश होता. यासोबतच, प्रात्यक्षिक सरावाच्या माध्यमातून अपघातस्थळ व्यवस्थापन आणि आपत्कालीन प्रतिसाद प्रक्रियेचा प्रत्यक्ष अनुभव सहभागी युवकांना देण्यात आला. प्रशिक्षणाच्या समारोपप्रसंगी प्रशिक्षणार्थी युवकांच्या शंकाचे निराकरण करण्यात आले. तसेच सहभागी युवकांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. या प्रशिक्षणामुळे स्वयंसेवकांना प्रत्यक्ष क्षेत्रात रस्ते सुरक्षा उपक्रमांसाठी कार्य करण्यास आवश्यक ज्ञान व कौशल्ये प्राप्त होण्यास मदत झाली.

यावेळी नागपूर ग्रामीणचे वरिष्ठ पोलीस अधीक्षक यांनी सांगितले की, नागपूर ग्रामीण पोलीस स्थानिक समुदायांना सक्षम करण्यासाठी आणि सडक सुरक्षा मित्र स्वयंसेवकांना जिल्ह्याच्या रस्ते सुरक्षा व्यवस्थेचा सक्रिय भाग बनविण्यासाठी त्यांच्या समवेत समन्वयाने कार्य करण्यास कटिबद्ध आहेत. स्वयंसेवकांची कार्यक्षमता वाढवून आणि समुदायाच्या सक्रिय सहभागाला प्रोत्साहन देऊन रस्ते सुरक्षेविषयी जनजागृती वाढविणे, अपघातांच्या वेळी तातडीने मदत उपलब्ध करून देणे आणि रस्ते अधिक सुरक्षित करण्यासाठी सामूहिक प्रयत्न करणे, हे आमचे उद्दिष्ट आहे. या माध्यमातून अपघाती मृत्यूंचे प्रमाण कमी करण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत.

यावेळी सेव्हलाइफ फाउंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी व संस्थापक श्री. पियुष तिवारी यांनी सांगितले की, रस्ते अपघातानंतरच्या ‘गोल्डन अवर’ अर्थात पहिल्या महत्त्वपूर्ण तासात वेळेवर वैद्यकीय मदत मिळाल्यास टाळता येण्याजोगे मृत्यू लक्षणीयरीत्या कमी होऊ शकतात, असे विविध संशोधनांतून दिसून आले आहे. नागपूर येथे आयोजित ‘सडक सुरक्षा मित्र’ प्रशिक्षणामुळे समुदाय स्तरावर कार्य करणाऱ्या स्वयंसेवकांची क्षमता अधिक बळकट झाली आहे. रस्ते अपघातांच्या वेळी तातडीने मदत उपलब्ध करून देणाऱ्या यंत्रणेतील हे स्वयंसेवक महत्त्वाची भूमिका बजावतील. (**Zero Fatality District Programme**) पुढे नेण्यासाठी तसेच प्रत्यक्ष क्षेत्रात रस्ते सुरक्षा आणि आपत्कालीन प्रतिसाद व्यवस्था बळकट करण्यासाठी सहकार्य केल्याबद्दल आम्ही नागपूर ग्रामीण पोलिसांचे आभारी आहोत.

नागपूर ग्रामीण पोलीस आणि सेव्हलाइफ फाउंडेशन यांच्या संयुक्त पुढाकारातून रस्ते सुरक्षेविषयी जबाबदार वर्तनाला प्रोत्साहन देणे, युवकांचा सहभाग वाढविणे आणि स्थानिक पातळीवर अपघातग्रस्तांना तातडीची मदत मिळण्याची क्षमता विकसित करणे यावर भर देण्यात येत आहे. नागरिकांच्या सहभागातून रस्ते अपघातांमुळे होणारी जीवितहानी टाळण्यासाठी हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार आहे.










Sadak Suraksha Mitra
TRAINING AND ORIENTATION PROGRAMME
Organised by:

## मोटारपंप चोरी करणाऱ्या आरोपीस अटक, भिवापूर पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन भिवापुर :— **मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा व श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा आणि श्री मयंक माधव सहा. पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी उमरेड विभाग यांच्या मार्गदर्शनात सहा पोलीस निरीक्षक श्री अजितसिंह देवरे, प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन भिवापुर यांच्या नेतृत्वात भिवापूर पोलीसांनी पोलीस स्टेशन भिवापूर येथे दाखल विद्युत मोटारपंप चोरीचा गुन्हा उघडकीस आणुन एका आरोपीला अटक केले आहे.**

पोलीस स्टेशन भिवापूर अंतर्गत फिर्यादी नामे कृपाकर जागोजी गिरडकर, वय ३५ वर्ष, रा. कारगाव ता. भिवापुर यांनी पोलीस ठाणे, भिवापूर येथे येवुन रिपोर्ट दिली की, दि. ११/१०/२०२६ रोजी फिर्यादी यांची शेतामध्ये पिकाला पाणी देण्याकरीता कॅनलवर असलेली मोटारपंप कोणीतरी अज्ञात चोराने चोरी केल्याबाबत फिर्यादीचे रिपोर्टवरुन पोलीस स्टेशन भिवापूर येथे अप. क्र. ६८२/२०२६ ,भान्यासं ३०३(२) अन्वये गुन्हा नोंद आहे.

भिवापूर पोलीस स्टेशनचे गुन्हे शोध पथकाचे अधिकारी आणि अंमलदार यांनी गुप्त बातमीदार आणि तांत्रिक पुराव्याच्या आधारे सदर गुन्ह्यातील अज्ञात आरोपीचा शोध घेवुन दिनांक १३/१०/२०२६ रोजी संशयित आरोपी ओमकेश ओमप्रकाश गुडधे रा. मानोरा यास ताब्यात घेवुन त्याचेकडे कौशल्यपुर्ण विचारपुस केली असता त्याने पोस्टे भिवापूर परिसरात विद्युत मोटारपंप चोरीचा गुन्हा केल्याचे कबुल केले. आरोपीकडुन पंचासमक्ष चोरी गेलेली लक्ष्मी कंपनीचे पानबुडी मोटारपंप किंमती ९०००/— रुपये व केबल वायर ४५ फुट किंमती १०००/—रूपये व गुन्हयात वापरलेली मो.सा. क्र. एम.एच.४० डी.डी. ०२०७ किंमती ८००००/— रुपये असा एकुण ९०,०००/— रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. सदर गुन्हयातील **आरोपीस अटक करण्यात आली आहे.**



## सायबर सुरक्षा जनजागृती महिना — ऑक्टोबर २०२६ अंतर्गत नागपुर ग्रामीण जिल्हयात राबविण्यात येत आहे सायबर सुरक्षा जनजागृती मोहीम

नागपुर ग्रामीण जिल्हयात **सायबर सुरक्षा जनजागृती महिना — ऑक्टोबर २०२६ अंतर्गत** मा. श्री. हर्ष ए पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात सायबर सुरक्षा जनजागृती मोहीमेअंतर्गत विविध पोलीस स्टेशन अंतर्गत खालील प्रमाणे सायबर सुरक्षा जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला.

**पोलीस स्टेशन नरखेड** :— सहा. पोलीस निरीक्षक श्री मंगला मोकाशे, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन नरखेड यांनी पोस्टे नरखेड हद्दीमधील इंदिरा गांधी हायस्कूल येनीकोणी येथे सायबर जनजागृती कार्यक्रम घेतला.

**पोलीस स्टेशन भिवापूर** :— सहा. पोलीस निरीक्षक श्री अजितसिंग देवरे, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन भिवापूर आणि पोलीस उपनिरीक्षक स्वप्नील गेडाम, पोहवा निखिल वासनिक

यांनी भिवापुर एज्युकेशन सोसायटी बॉईज कॉलेज येथे सायबर जनजागृती कार्यक्रम घेतला. तसेच मौजा जवळी येथे गावकरी, शालेय विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक, शेतकरी यांना सायबर जनजागृतीपर मार्गदर्शन केले.

**पोलीस स्टेशन उमरेड** :— पोलीस निरीक्षक श्री धनाजी जळक, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन उमरेड आणि पोलीस उपनिरीक्षक श्री किरण महागावे यांनी मौजा मंगळवारी पेठ येथे भेट देवुन सायबर जनजागृती कार्यक्रम घेतला. सदर कार्यक्रमास गरबा क्लासचे गरबा तरुण—तरुणी उपस्थित होते.

**पोलीस स्टेशन कोंढाळी** :— सहा पोलीस निरीक्षक श्री. रोशन बावनकर, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन कोंढाळी यांनी मासोद हायस्कूल मासोद येथे भेट देवुन सायबर जनजागृती कार्यक्रम घेतला.

**पोलीस स्टेशन वडोदा** :— पोलीस उपनिरीक्षक श्री. महेश बोथले पोलीस स्टेशन वडोदा यांनी मौजा वडोदा येथील गांधी विद्यालय हायस्कूल वडोदा येथे सायबर जनजागृती कार्यक्रम घेतला

**सदर कार्यक्रमामध्ये सायबर जनजागृती व्हिडीओ दाखविण्यात आले. सायबर गुन्ह्यांचे विविध प्रकार, बनावट सोशल मीडिया प्रोफाईल, आर्थिक फसवणूक, फसवे कॉल व संदेश यापासून बचाव करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. अनोळखी लिंक, ओटीपी, बनावट नोकरीच्या जाहिराती पासून सावध राहण्याबाबत मार्गदर्शन केले. मॉर्फिंग ,फिशींग, डिजिटल अरेस्ट, ट्रेडींग फसवणुक , तसेच डिजिटल व्यवहारांमध्ये घ्यावयाची काळजी याबाबत सविस्तर माहीती देवुन सायबर जनजागृती करण्यात आली. फसवणूक झाल्यास तात्काळ ’सायबर हेल्पलाईन १९३० वर संपर्क साधावा किंवा cybercrime.gov.in या संकेतस्थळावर तक्रार नोंदवावी, असे आवाहन करण्यात आले.**

**नागरिकांनी डिजिटल व्यवहार करताना सतर्कता बाळगावी, कोणत्याही अनोळखी व्यक्तीस वैयक्तिक अथवा बँकिंग माहिती देऊ नये आणि सायबर फसवणूक झाल्यास विलंब न हेल्पलाईन क्रमांकावर तक्रार नोंदवावी, असे आवाहन नागपूर ग्रामीण पोलीसांकडून करण्यात आले आहे.**


2026.10.12 14:18


ऑक्टोबर 2026
राष्ट्रीय
सायबर सुरक्षा
जनजागृती महिना








## अवैधरित्या विनापरवाना देशी दारूची वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद, ०५ लाख १८ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त, स्थानिक गुन्हे शाखेची कामगिरी

**पोलीस स्टेशन काटोल** :— दिनांक १२/१०/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शखेच पथक पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गोपनिय माहीती मिळाली की, चारचाकी वाहनाने अवैधरीत्या देशी दारूची वाहतुक करीत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी तात्काळ काटोल हद्दीतील खुटांबा रोड येथे नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान चारचाकी हुंदाई आय १० वाहन क्र. एम एच—२७/ए आर—८६२५ मिळुन आले. वाहन थांबवुन वाहनाची पंचासमक्ष पाहणी केली असता देशी दारू मिळुन आली. **आरोपी नामे १) दिनेश उर्फ देवा वासुदेव कोचे, वय ३८ वर्षे, रा. रामनगर कोंढाळी २) घनश्याम तांदळे, वय २७ वर्षे, रा. काटोल हे अवैधरीत्या देशी दारूची वाहतुक करतांना मिळुन आले.**

**पोलीसांनी पंचासमक्ष १) देशी दारूच्या २०० निपा किंमती १८०००/—रूपये २) चारचाकी हुंदाई आय १० वाहन क्र. एम एच—२७/ए आर—८६२५ किंमती ५,००,०००/—रूपये असा एकुण किंमती ५,१८,०००/— रुपयांचा मुददेमाल जप्त केला**

**आहे. नमुद आरोपी यांचेविरूद्ध महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**




## अवैधरित्या विनापरवाना देशी दारूची वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद, ५३ हजार २०० रूपयांचा मुद्देमाल जप्त, भिवापूर पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन भिवापूर** :— दिनांक १२/१०/२०२६ भिवापूर पोलीसांना गोपनिय माहीती मिळाली की, दुचाकी वाहनाने अवैधरीत्या देशी दारूची वाहतुक करीत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी तात्काळ महसुल नाक्याजवळ नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान होन्डा शाईन क्रमांक एम एच—४०/ए एल—२८८२ मिळुन आले. वाहन थांबवुन वाहनाची पंचासमक्ष पाहणी केली असता देशी दारू मिळुन आली. **आरोपी चालक नामे १. जालंदर हरिचंद्र ढोक, वय ३५ वर्ष, रा. महात्माफूले नगर डायमंड बार च्या पाठीमागे भिवापूर ता. भिवापूर २) विनोद बाळकृष्ण शंभरकर, वय २८ वर्ष, रा. शिदार्थ नगर, भिवापूर ता. भिवापूर ३. सचिन बाळकृष्ण शंभरकर, वय ३५ वर्ष, रा. सिदधार्थ नगर भिवापुर हे अवैधरीत्या देशी दारूची वाहतुक करतांना मिळुन आले.**

**पोलीसांनी पंचासमक्ष १) देशी दारूच्या ४० निपा किंमती ३२००/—रूपये २) होन्डा शाईन क्रमांक एम एच—४०/ए एल—२८८२ किंमती ५०,०००/—रूपये असा एकुण किंमती**

**५३,२००/— रुपयांचा मुददेमाल जप्त केला आहे. नमुद आरोपी यांचेविरूद्ध महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## अस्तित्व लपवुन गुन्हा करण्याच्या उद्देशाने फिरणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा नोंद

**पोलीस स्टेशन अरोली** :— दिनांक ११/१०/२०२६ रोजी अरोली पोलीस अवैध धंदयावर कारवाई करणेकामी पेट्रोलींग करीत असता आरोपी नामे **जयपाल महादेव गजभिये, वय ४७ वर्ष, रा. बाई नारा. वार्ड क्र. ०२ अरोली हा चोखाजा फाटा** येथे स्वत:चे अस्तित्व लपवुन सुर्यास्तानंतर आणि सुर्योदयाच्या पुर्वी संशयास्पदरीत्या फिरतांना मिळुन आला. सदर इसमास त्याचे नाव व गाव विचारले असता त्यांनी उडवा उडवीचे उत्तरे दिली. नमुद आरोपी हा दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने वावरतांना मिळुन आल्याने आरोपीचे विरूद्ध कलम १२२ महाराष्ट्र पोलीस अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## पोलीस स्टेशन काटोल अंतर्गत जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी परस्परविरोधी गुन्ह्यांत ३ आरोपींना अटक

**पोलीस स्टेशन काटोल :— दिनांक १२/१०/२०२६ रोजी फिर्यादी श्री. विजय शेषराव कठाने, वय ४७ वर्षे, रा. खंते लेआउट, काटोल व त्यांचे मित्र राकेश हेडाऊ यांचा दिनेश रामकृष्णा निंबाळकर, वय ४७ वर्षे, रा. पंचवटी, काटोल याच्यासोबत जुन्या वादाच्या कारणावरून वाद झाला. या वादाचे रूपांतर हाणामारीत झाले. यावेळी दोन्ही बाजूंकडून एकमेकांवर जिव घेणा हल्ला करण्यात आला, ज्यामध्ये संबंधित व्यक्ती जखमी झाल्या. तसेच, एकमेकांना जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याच्या तक्रारी देण्यात आल्या.**

**सदर घटनेप्रकरणी दोन्ही बाजूंकडून परस्परविरोधी तक्रारी प्राप्त झाल्यानंतर पोलीस स्टेशन काटोल येथे खुनाचा प्रयत्न —भारतीय न्याय संहिता कलम १०९(१) अन्वये गुन्हे नोंद करण्यात आले आहेत. काटोल पोलिसांनी दोन्ही गुन्ह्यांतील एकूण ३ आरोपींना अटक केली असून, पुढील तपास पोलीस स्टेशन काटोल पोलीस करीत आहेत.**

# अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्यावर एन.डी.पी.एस कायदयान्वये १२ गुन्हे नोंद

मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण आणि श्री. अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक १२/१०/२०२६ रोजी विविध पोलीस स्टेशन येथे विशेष मोहिम राबवुन अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध कलम २७ एन. डी. पी. एस कायदयान्वये १२ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन सावनेर** अंतर्गत आरोपी १) बनीसिह कंचनसिंह, वय ३३ वर्ष, रा. बलना, ता. जि. हातरस, २) संजय रामाजी कडु, वय ४८ वर्ष, रा. वार्ड क्र १४ चिचपुरा सावनेर हा चिचपुरा ३) प्रकाश हरप्रसाद, रा. गाव अरनैया तलेसर, पो. नोरथा इसेपुर तह. सिकंरदा रा. जि. हाथरस उतरप्रदेश ४) अशोक कुमार कंचनसिंग, रा. गढीबल्ला बलना महामायानगर बलना हाथरस उतरप्रदेश ५) आरोपी आकाश टेकचंद टिकम, वय ३० वर्ष, रा. चिचपुरा, सावनेर ६) राकेशकुमार भोजराज सिंग वय ५२ वर्ष रा अर्णी तलेसर हाथरस उतरप्रद हे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आले. **पोलीस स्टेशन खापा** अंतर्गत आरोपी क्र १) सलीम रहमान शाहा, वय ६७ वर्षे, रा.कोदेगाव ता.सावनेर जि.नागपुर हा सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. **पोलीस स्टेशन कळमेश्वर** अंतर्गत १) आरोपी रामगोपाल नेपाल लांजेवाल, वय ३९ वर्ष, रा. वार्ड क्र १३, डोगरे ले आउट कळमेश्वर हा सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. **पोलीस स्टेशन भिवापूर** अंतर्गत १) आरोपी नामे नितेश ईश्वर दिघोरे, वय ३० वर्ष, रा. धर्मापूर, भिवापूर ता. भिवापूर, जि. नागपूर हा सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. **पोलीस स्टेशन उमरेड** अंतर्गत आरोपी क्र १) महजर हफीज खान वय ३२ वर्ष, रा. नुरी मस्जीद के पास प्लॉट नं. २६९ हमीद नगर उप्पलवाडी नागपुर हा सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. **पोलीस स्टेशन जलालखेडा** अंतर्गत आरोपी क्र १) राहुल रामचंद्र रोडके, वय ३४ वर्ष, रा. लाखोरी लाखनी, जि. भंडारा ह.मु पेठ मुक्तापुर ता नरखेड जि नागपुर सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. **पोलीस स्टेशन कोंढाळी** अंतर्गत आरोपी क्र १) रविकुमार रामदेव राम, वय २२ वर्ष, रा. वार्ड नं. ०५, बनारसी मोहला

रामानुजगंज जि. बलरामपूर छत्तीसगढ ह.मु.सागंवा जि. नागपूर हा सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. **पोलीस स्टेशन वडोदा** अंतर्गत आरोपी आरोपी क्र १) राकेश दशरथ लुटे, वय २५ वर्ष, रा. वडोदा, ता. कामठी, जि नागपुर हा सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला.

वरील नमुद आरोपीतांविरूध्द कलम २७ एनडीपीएस कायदयान्वये १२ गुन्हे नोंद केले आहे.

## नागपुर ग्रामीण जिल्ह्यातील ६७८ रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक १३/१०/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व २४ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. **एकुण ६७८ आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**

**नागपुर उपविभाग** :— नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बुट्टीबोरी येथे ३० आरोपी, पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे ३० आरोपी अशा एकुण ९० रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :— उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे ४२ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे २७ आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे २३ आणि पोलीस स्टेशन वेलतुर २५ आरोपी पोलीस स्टेशन पाचगाव १२ आरोपी अशा एकुण १२९ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग :—** सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ३४ आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे ३६ आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे १८ आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३२ आरोपी, पोलीस स्टेशन मोहपा येथे १५ आरोपी, अशा एकुण १३५ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३३ आरोपी, पोलीस स्टेशन मौदा येथे १९ आरोपी पोलीस स्टेशन वडोदा येथे १८ आरोपी अशा एकुण ७० रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग :—** रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे ३२ आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३१ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे २१ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे २३ आरोपी अशा एकुण १०७ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग :—** काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ४५ आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे २५ आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ४९ आरोपी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे २८ आरोपी अशा एकुण १४७ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.






## अवैध दारू निर्मिती, विक्री आणि सेवन तसेच वाहतूक करणाऱ्यांवर १७ गुन्हे दाखल,

**दिनांक १२/१०/२०२६ रोजी मा. श्री. हर्ष पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा व श्री. अनिल मस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली अवैध दारूची निर्मिती, विक्री, साठवणूक तसेच दारूचे सेवन करणाऱ्या व्यक्तींविरुद्ध प्रभावी कारवाई करून दारूबंदी कायद्यान्वये एकूण १७ गुन्हे दाखल केले.**

**पोलीस स्टेशन अरोली** येथे महिला आरोपी हिचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन जलालखेडा** येथे महिला आरोपी हिचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन नरखेड** येथे आरोपी नामे १. मोहन पांडुरंग बनकर, वय ४० वर्ष, रा. वार्ड क्र. १७, नरखेड २. अनिल सोनीराम उईके, वय २४ वर्ष, रा. गोधनी ता नरखेड ३. सुनिल गुलाबसिंग नैनावत, वय ३५ वर्ष, रा. नरखेड, ता. नरखेड ४. सुधाकर नारायण सेंबेकर, वय ५२ वर्ष, रा. वार्ड नं.२ खैरगाव ता नरखेड ५. सागर कैलासराव पारेशी, वय २७ वर्ष, रा. वार्ड नं. ४ खैरगाव, ता. नरखेड ६. महिला आरोपी यांचेवर प्रत्येकी ०१ गुन्हा असे ०६ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन काटोल** येथे आरोपी नामे चंद्रमणी ज्ञानेश्वर लोंखंडे, वय ५७ वर्ष, रा. ईसापुर खु ता. काटोल याचेवर ०१ गुन्हा नोंद. तसेच १) दिनेश उर्फ देवा वासुदेवराव कोचे, रा वार्ड क्रं २ रामनगर कोंढाळी, २)

घनश्याम पुंडलिंकराव तांदळे, रा. काटोल याचेवर ०१ गुन्हा नोंद. **पोलीस स्टेशन भिवापूर** येथे आरोपी नामे देविदास उर्फ टपरी रनकुजी भगत, वय ६० वर्ष, रा. नांद गरपेठ, ता. भिवापूर, जि. नागपूर याचेवर ०१ गुन्हा नोंद. आरोपी नामे १) जालंदर हरिचंद्र ढोक, वय ३५ वर्ष, रा. महात्माफूले नगर डायमंड बार च्या पाठीमागे भिवापूर ता. भिवापूर २) विनोद बाळकृष्ण शंभरकर, वय २८ वर्ष, रा. शिदार्थ नगर, भिवापूर ता. भिवापूर ३. सचिन बाळकृष्ण शंभरकर, वय ३५ वर्ष, रा. सिदधार्थ नगर भिवापुर यांचेवर ०१ गुन्हा नोंद. **पोलीस स्टेशन पाचगाव** येथे आरोपी नामे १. ज्ञानेश्वर उर्फ नानु लालचंद पवार, वय ४० वर्ष, राह. पारधी बेडा चांपा, ता. उमरेड जिल्हा नागपुर २. श्रीचंद लालाचंद पवार, वय ४० वर्ष, राह. पारधी बेडा चांपा ता. उमरेड जिल्हा नागपुर ३. महिला आरोपी यांचेवर प्रत्येकी ०१ गुन्हा असे ०३ गुन्हे नोंद. **पोलीस स्टेशन वडोदा** येथे आरोपी नामे मो. जाबिद मो. असलम ह. मु. गुमथळा याचेवर ०१ गुन्हा नोंद. **पोलीस स्टेशन केळवद** येथे आरोपी नामे रामेश्वर पुरुषोत्तम वाडी, वय ४२ वर्ष, रा. नरसाळा, ता. सावनेर याचेवर ०१ गुन्हा नोंद.

**नमुद कारवाईत एकुण ३०१५० मिली देशी दारू, २७० मिली विदेशी दारू, १०८ लीटर मोहाफुल दारू, ५३०० लीटर मोहाफुल सडवा, दारू गाळण्याचे साहीत्य १ मोसा व १ कार असा एकुण ८,१८,३१०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

जनसंपर्क अधिकारी
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर